श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर - II)

ता.शेवगांव,जि.अहमदनगर (महा.) पिन ४१४ ५०२

Email : kvkdahigaon@gmail.com Website : www.kvkdahigaon.org

✲ आम्हास फॉलो करा : kvk.dahigaon kvkahmednagar2 DahigaonKvk

कालावधी : जानेवारी ते मार्च २०२६

## ई न्युज लेटर

अंक क्र.२०२६/१

### शेतावर तंत्रज्ञान तपासणी (OFT) -

**विषय : गहु पिकावरील करपा व तांबेरा रोग व्यवस्थापन**

शेवगाव तालुक्यात गहू हे रबी हंगामात घेतले जाणारे प्रमुख अन्नधान्य पीक असून,शेतकरी HD2189,Lok1,M-CS 496 इत्यादी खाण्यासाठी उत्तम असलेल्या जातीची निवड करतात. या जातीवर हिवाळ्यातील थंड व दमट हवामानामुळे मोठ्या प्रमाणात करपा (Leaf Blight) व पिवळा तांबेरा (Yellow Rust) या रोगांचा प्रादुर्भाव आढळतो. या रोगांमुळे उत्पादनात मोठी घट होते. त्यामुळे कृषि विज्ञान केंद्र दहीगाव ने यांनी एकात्मिक रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाचे कोळगाव येथे १० निवडक शेतकऱ्याच्या शेतावर चाचणी प्रयोग राबवण्यात आले. गहू पिकावर करपा व पिवळा तांबेरा रोग व्यवस्थापनासाठी पिकाक्शीस्ट्रोबीन ७.०५% + प्रोपीकोनाझोल ११.७१% , २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून रोगाचा प्रादुर्भाव दिसताच दोन फवारण्या केल्यामुळे रोगाचे प्रमाण कमी होऊन उत्पादनात वाढ झाल्याचे आढळून आले. हे तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरले.




### पथदर्शी प्रात्यक्षिक (FLD) -

**विषय : बाजरी पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन देणारे जैव संतृप्त वाण ए.एच.बी. १२०० वाणाचा प्रात्यक्षिक**

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात उन्हाळी हंगामात बाजरी पिक घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने संकरित वाणांचा वापर केला जातो त्यामुळे मानवी आहारात घेतले जाणारे अन्न सकस नसल्याने शरीराचे पोषण व्यवस्थित होत नाही. तसेच यापासून मिळणारे उत्पादन सुद्धा कमी प्रमाणात मिळते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान व कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने अंतर्गत माळी चिंचोरा तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथील शेतकऱ्यांसाठी बाजरी पिकाचे जैव संतृप्त वाण ए.एच.बी. १२०० चा वापर करून अपेक्षित धान्य उत्पादन तसेच आहारातून जास्त प्रमाणात फेरस आणि जस्त हि पोषण द्रव्ये मिळविण्यासाठी २५ प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर बाजरी पिक प्रात्यक्षिक उन्हाळी हंगाम २०२६ घेत आहोत.



**विषय : कांदा पिकात रोग व्यवस्थापनासाठी सॅलीसिलिक ॲसिड चा वापर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील रबी हंगामात कांदा पिकाची लागवड माठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते आहे, बदलत्या वतावरणामुळे कांदा पिकावर रोग

आणि किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे आढळून येत आहे. या पिकावर फुलकिडी आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव  साधारण ५५–६० % पर्यंत आढळून येतो त्यामुळे उत्पादनात २० ते २७ टक्के पर्यंत घट येते या समस्येचा विचार करता कृषी विज्ञान केंद, दहीगाव–ने यांनी कीटकनाशक विरहीत पिक संरक्षण या तत्वाचा वापर प्रचलित करण्यासाठी शेतकऱ्याच्या शेतावर तंत्रज्ञान तपासणी चाचण्याचे आयोजन केले आहे. या प्रयोगासाठी कोळगाव, तालुका शेवगाव येथील १० शेतक–याची निवड करून सॅलीसिलिक ॲसिड या निविष्ठा प्रदान करण्यात आल्या. तसेच त्यांच्या  वापराचे तंत्र आणि मंत्र देण्यात आले.सदर प्रयोगाचे निष्कर्ष प्राप्त झाले त्यामध्ये रोगाचे प्रमाण कमी होऊन उत्पादन काढ झाल्याचे आढळून आले.




## शेतकरी प्रशिक्षण

### विषय : बाजरी जैव संतृप्त वाण उत्पादन तंत्रज्ञान

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान व कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने अंतर्गत माळी चिंचोरा तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथील शेतकऱ्यांसाठी बाजरी पिकाचे जैव संतृप्त वाण ए.एच.बी. १२०० चा वापर करून अपेक्षित धान्य उत्पादन तसेच आहारातून जास्त प्रमाणात फेरस आणि जस्त हि पोषण द्रव्ये मिळविण्यासाठी प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर बाजरी पिक प्रात्यक्षिक उन्हाळी हंगाम २०२६ नियोजन करण्यात आले असून येथील प्रगतशील शेतकऱ्यांना बाजरी पिकातील जैव संतृप्त वाण आणि त्यांचे उत्पादन तंत्रज्ञान या विषयी माहिती होण्यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी बाजरी जैव संतृप्त वाण उत्पादन तंत्रज्ञान या विषयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात माळी चिंचोरा येथील २७ प्रगतशील शेतकरी यांनी सहभाग घेतला. या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांना बाजरी पिकाच्या निविष्ठा देण्यात आल्या.




### विषय : दूध उत्पादन व्यवस्थापन

दूध उत्पादन व्यवस्थापन या प्रशिक्षणा साठी १९ शेतकऱ्यांनी  सहभाग नोंदवला, यामध्ये प्रशिक्षणार्थींना दुग्धव्यवसायात झपाट्याने होत असलेले बदल, व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच लसीकरण करणे काळाची गरज आहे, लम्पी स्कीन रोगाचे लसीकरनाद्वारे नियंत्रण करणे, जनावरांचे आरोग्य कसे सांभाळावे व चारा व खुराक किती प्रमाणात द्यावा याबाबत विषय विशेषज्ञ ( पशुधन उत्पादन ) यांनी मार्गदर्शन केले. दिनांक १७ फेब्रुवारी२०२६  रोजी सर्व प्रशिक्षणार्थींना कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर मुक्त संचार गोठ्याचे प्रात्यक्षीक  दाखवणयात आले.



**विषय : हरभरा पिकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन**

कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव – ने च्या माध्यमातून प्रगतशील शेतकऱ्यांना विविध पिकांचे आधुनिक तंत्रज्ञान या विषयी माहिती देण्यासाठी हरभरा एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयाच्या प्रशिक्षणाचे आयोजन दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी जळके खुर्द तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे करण्यात आले. सदर प्रशिक्षणात २७ प्रगतशील शेतकरी यांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणात हरभरा पिकासाठी सेंद्रिय, जैविक आणि रासायनिक खतांचा एकात्मिक पद्धतीने वापर कसा करावा या विषयी माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमास सलाबातपूर मंडळाचे प्रभारी मंडळ कृषि अधिकारी तसेच उप कृषि अधिकारी हे उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमानंतर हरभरा पिक प्रात्यक्षिक प्लॉट ला भेट देण्यात आली.




**विषय : शाश्वत ऊस उत्पादन तंत्रज्ञान**

कृषि विज्ञान केंद्र, कार्यक्षेत्रात ऊस पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. परंतु ऊस पिकाची पाहिजे तेवढी उत्पादकता मिळत नाही. त्यासाठी ऊस पिकाचे शाश्वत पद्धतीने उत्पादन घेणे गरजेचे आहे. हाच उद्देश समोर ठेऊन दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी महा लक्ष्मी हिवरे तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने , महाराष्ट्र शासन कृषि विभाग आणि मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनई यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत ऊस उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण महालक्ष्मी हिवरे येथील प्रगतशील शेतकरी अमोल निर्मळ यांच्या शेतावर पार पडला. सदर प्रशिक्षणात ऊस पिकांचे विविध वाण, सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञान, ऊसाची रोप पद्धतीने लागवड तंत्रज्ञान , ऊस लागवड व्यवस्थापन, ऊस बेणे निवड आणि बेणे प्रक्रिया, एकात्मिक अन्नद्रव्य, तण नियंत्रण , किड व रोग नियंत्रण, पाणी व्यवस्थापन या विविध मुद्यांवर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमामध्ये तालुका कृषि अधिकारी नेवासा, मा. चेअरमन, मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनई तसेच कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमात ३४ प्रगतशील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.



**विषय : संत्रा पिकातील बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात संत्रा पिकाखालील क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. संत्रा पिकातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नामुळे शेतकऱ्यांचा नविन लागवडीकडे कल वाढत आहे. येळी व परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे प्रमुख महत्वाचे पिक बनले आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची क्षमता वृद्धी करणे गरजचे आहे. बहार व्यवस्थापन तंत्रज्ञानाद्वारे एकाच वेळी फुलधारणा व फळ धारणा होत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशिर ठरते. अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी, हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी शेतकऱ्यांचे दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी येळी येथे संत्रा पिकातील बहार व्यवस्थापन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने व तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये ३३ शेतकर्यांनी सहभाग नोंदवला.



**विषय : उन्हाळी भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान**

कोरडवाहु भागामध्ये उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासत असल्यामुळे कमी कालावधीमध्ये येणार्या उन्हाळी भाजीपाला लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल जास्त असतो. भाजीपाला पिकाला उन्हाळ्यात चांगला  बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल भाजीपाला लागवडीकडे वाढत आहे. अयोग्य लागवड पद्धत, पाणी व्यवस्थापनाचा अभाव, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापनाचा अभाव, कीड व रोग व्यवस्थापनाचा अभाव या कारणांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न घेणे शक्य होत नाही. अपेक्षित उत्पन्न मिळवण्यासाठी, हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी शेतकऱ्यांचे दिनांक ६ फेब्रुवारी  २०२६ रोजी मोहोज येथे उन्हाळी भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने च्या वतीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये ३० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.



विषय : निर्यातक्षम डाळींब उत्पादन तंत्रज्ञान.

बदलत्या हवामानामुळे डाळींब पिकातील समस्यामध्ये वाढ होत आहे. अयोग्य लागवड पद्धत, पाणी व्यवस्थापनाचा अभाव, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थाप – नाचा अभाव, कीड व रोग व्यवस्थापनाचा अभाव या कारणांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न घेणे शक्य होत नाही. निर्यातक्षम डाळींब उत्पादन घेण्यासाठी डाळींब उत्पादक शेतकऱ्यांची क्षमता वृद्धी करणे गरजचे आहे. लागवड पद्धत, पाणी व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन इ. विषयांवर डाळींब उत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. या हेतूने दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पाथर्डी तालुक्यातील धामनगाव येथे डाळींब उत्पादक शेतकऱ्यांसाठी निर्यातक्षम डाळींब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर कृषि विज्ञान केंद्र दहीगाव–ने व तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने  प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये ४२ प्रगतशील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.



विषय :कृषि ड्रोनद्वारे फवारणी तंत्रज्ञान व त्याचे फायदे

दि. ८ जानेवारी २०२६ रोजी, गाव खामगाव, ता. शेवगाव येथे कृषि ड्रोन फवारणीचे फायदे, ड्रोन वापरताना घ्यावयाची काळजी, ड्रोन वापरताना येणाऱ्या अडचणी व उपाय या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात २५ शेतकरी पुरुष व महिलांनी सहभाग नोंदवला.





**विषय : अद्यावत ऊस लागवडः यंत्राचा वापर आणि सराव**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने येथे दि. ९ जानेवारी, २०२६ रोजी ट्रॅक्टरचलित ऊस लागवड यंत्र या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. ऊस लागवडीचा वाढता खर्च व मजूरांची टंचाई यावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी ऊस लागवड यंत्राचा वापर करावा असे आवाहन केव्हीके द्वारे उपस्थित शेतकऱ्यांना करण्यात आले.





**विषय : हवामान पूरक ऊस शेती**

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने येथे दि. २५ मार्च, २०२६ रोजी हवामान पूरक ऊस शेती या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमात शेतकऱ्यांना, ऊसाच्या सुधारित जातींची निवड, लागवड पद्धती, पाणी व्यवस्थापन, ऊस शेतीतील यांत्रिकीकरण इ. विषयवार मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी केव्हीके दहिगाव–ने प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ, डॉ. कौशिक, भारतीय ऊस संशोधन उपकेंद्र प्रवरानगर येथील शास्त्रज्ञ डॉ. बोरसे व डॉ. थोरात तसेच केव्हीके चे सर्व शास्त्रज्ञ उपस्थित होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ५० शेतकरी उपस्थित होते.





विषय : हवामान बदल व शेती

कृषी विज्ञान केंद्र दहिगाव ने च्यावतीने एक दिवसीय हवामान बदल व शेती या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक १० मार्च २०२६ रोजी करण्यात आले. हवामान बदलाचे शेती क्षेत्रावर मोठे विपरीत परिणाम होत आहेत, या परिणामास सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी तयार असणे गरजचे आहे. यावेळी पिकांमध्ये तयार होणारा जैविक व अजैविक ताण, या अनुषंगाने पिक पद्धती मध्ये करावयाचे बदल, विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव, त्यावरील उपाययोजना, प्रतिकूल परिस्थितीमध्ये करावयाचे अन्नद्रव्यांचे निजोयन, आपत्कालीन पिक नियोजन इ. विषयांवर यावेळी मार्गदर्शन करून चर्चा करण्यात आली. सदरच प्रशिक्षण वर्ग ईफको, नाशिक यांच्या समवेत प्रशिक्षण व भेट कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात आला. केव्हीके दहिगाव–ने येथे आयोजित या प्रशिक्षण वर्गात नाशिक जिल्ह्यातील एकूण २५ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी शेतकऱ्यांसाठी केव्हीके प्रक्षेत्र भेट करण्यात आली त्यामध्ये प्रक्षेत्रावरील सर्व पिके व विविध प्रकल्पास भेटी देऊन चर्चा करण्यात आली.



विषय : तृणधान्यावरील प्राथमिक प्रक्रिया व मूल्यवर्धन

राक्षी ता. शेवगाव येथे तृणधान्य पिकांसाठी प्राथमिक प्रक्रिया व मूल्यवर्धन या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. यामध्ये रब्बी हंगामातील प्रमुख पिके जसे ज्वारी, गहू, मका इ. पिकांची साठवण, प्राथमिक प्रक्रिया व मूल्यवर्धन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यापासून होणारे फायदे, स्वयंरोजगार साठीच्या संधी, प्रक्रिया व मूल्यवर्धन केलेल्या मालाचे ब्रांडींग, जाहिरात, शासकीय परवाना व विपणन याबद्दल देखील मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र शासन कृषि विभागाचे सहायक कृषि अधिकारी श्री काळे, उप कृषि अधिकारी श्री अजय देशमुख, मंडळ कृषि अधिकारी श्री प्रशांत टेकाळे व गावातील प्रमुख शेतकरी हजर होते.



**विस्तार उपक्रम**

**शेती दिन : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत आदर्श कडधान्य गाव, पिक तूर, वाण बी.डी.एन. २०१३–४१ (गोदावरी) प्रात्यक्षिक.**

श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव – ने ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर –२ अंतर्गत शेवगाव तालुक्यातील वरखेड आणि पाथर्डी तालुक्यातील मोहज देवढे या दोन गावांमध्ये शेती दिनाचे आयोजन दिनांक ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. सदर शेती दिन कार्यक्रमात ११८ प्रगतशील शेतकरी यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत आदर्श कडधान्य गाव या अंतर्गत वरील गावातील ५०० प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर तूर पिक वाण बी.डी.एन. २०१३–४१ (गोदावरी) या वाणाचे समूह





### शेती दिन : जैव संतृप्त गहू उत्पादन तंत्रज्ञान

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान व कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने अंतर्गत कोळगाव, हसनापूर आणि मंगरूळ बु., तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील शेतकऱ्यांसाठी गहू पिकाचे जैव संतृप्त वाण एच.आय. १६३३(पुसा वाणी) आणि एच.आय. १६३४ (पुसा अहिल्या ) या जैव संतृप्त वाणांचा वापर करून अपेक्षित धान्य उत्पादन तसेच आहारातून जास्त प्रमाणात प्रथिने तसेच फेरस आणि जस्त हि पोषण द्रव्ये मिळविण्यासाठी प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर गहू पिक प्रात्यक्षिक रब्बी हंगाम २०२६ घेण्यात आले आहे. प्रगतशील शेतकऱ्यांना गहू पिकातील जैव संतृप्त वाण आणि त्यांचे उत्पादन तंत्रज्ञान तसेच उत्पादकता याच्या विषयी जास्तीत जास्त शेतकऱ्यांमध्ये प्रचार आणि प्रसार होण्याच्या दृष्टीने दिनांक ११, १२ व २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कोळगाव, मंगरूळ बु., आणि हसनापूर ता. शेवगाव येथे गहू जैव संतृप्त वाण उत्पादन तंत्रज्ञान या विषयाच्या शेती दिनाचे आयोजन करण्यात आले. या शेती दिन कार्यक्रमास कोळगाव येथे ३६ , मंगरूळ बु., येथे ४० तर हसनापूर येथे ४५ असे एकुण १२१  प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.



### जागतिक महिला दिन आयोजन

कृषि विज्ञान केंद्र दहिगाव–ने व समाज विकास समिती नेवासा यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा येथे ७ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला नेवासा मतदार संघाचे विद्यमान आमदार मा. विठ्ठलराव लंघे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.





**कृषि प्रदर्शन सहभाग :**

महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, उमेद व जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ ते ९ फेब्रुवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथे 'कृषीपर्व ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कृषि व पूरक विषयांवर चर्चासत्र, नवीन शेती तंत्रज्ञानाची व योजनांची माहिती देणारे तसेच महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध उत्पादनांची विविध माहिती देणारी व विक्री स्टॉल यामध्ये सहभागी झाली होती. कृषि विज्ञान केंद्र , दहीगाव ने मार्फत कृषि प्रदर्शनात नैसर्गिक शेती बद्दल माहिती देणाऱ्या स्टॉल ची उभारणी करण्यात आली होती. 'कृषीपर्व ' चे उदघाटन मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील व ईतर मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी केव्हीके दहिगाव-ने च्या वतीने उभारलेल्या दालनास विविध विभागाचे अधिकारी व मान्यवरांनी भेटी



**केव्हीके शेती कट्टा :**

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सामुहिक प्रयत्न करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने कोळगाव ता. शेवगाव या गावाची निवड केलेली आहे. या गावांमध्ये दिनांक १७ जानेवारी २०२६ व दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी केव्हीके शेती कट्टा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील प्रमुख पिके कांदा, गहू, हरभरा, उन्हाळी भाजीपाला, कडधान्य पिकांची प्रक्रिया व मूल्यवर्धन, कांदा पिकाची काढणी व साठवणूक याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ व विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), विषय विशेषज्ञ (कृषि विद्या), विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी), विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार), कार्यक्रम सहायक (मृदा चाचणी) यांनी सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ४९ शेतकरी सहभागी झाले.



**पीएम किसान २२ व्या हप्त्याचे मा.पंतप्रधानांच्या शुभहस्ते वितरित**

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने येथे दिनांक १३ मार्च २०२६ रोजी पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत २२ वा हप्ता शेतकऱ्याच्या खात्यात हस्तांतरण माननीय प्रंतप्रधान मोदी यांचे शुभहस्ते खानपारा, गुवाहाटी, असम येथून करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण केव्हीके दहीगाव- ने येथे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. प्रमुख कार्यक्रमास सुरवात होण्याअगोदर उपस्थित शेतकऱ्यांना शेती व शेती पूरक व्यवसाय मधील नवीन तंत्रज्ञान, समस्या व अडचणी याबद्दल चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी केव्हीके चे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस.एस.कौशिक, तालुका कृषि अधिकारी शेवगाव श्री अंकुश जोगदंड, मंडळ कृषि अधिकारी श्री प्रशांत टेकाळे परिसरातील शेतकरी हजर होते.





**विकसित भारत जी राम जी विधेयक जनजागृती अभियान**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे सुचनेनुसार विकसित भारत जी राम जी विधेयक बद्दल जनजागृती करण्याच्या अनुषंगाने दिनांक ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी विशेष अभियान राबवण्यात आले. यामध्ये दिनांक ३ जानेवारी रोजी केव्हीके दहीगाव–ने येथे सरपंच संमेलन आयोजित करण्यात आले. यामध्ये परिसरातील विविध सरपंच व ईतर प्रमुख पदाधिकारी यांनी सहभाग घेतला. तर दिनांक ४ जानेवारी रोजी शेवगाव व नेवासा तालुक्यातील २१ गावांमध्ये विविध जनजागृतीपर कार्यक्रम घेऊन भारत सरकारच्या वतीने मंजूर केलेल्या व्हीबी. जी राम जी विधेयक बद्दल माहिती देण्यात आली.


# कृषि विज्ञान केंद्र, दहिगांव-ने (अहमदनगर ॥)

**डॉ.एस.एस.कौशिक (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.कें.दहिगाव-ने,ता.शेवगांव**

यांनी दहिगाव–ने येथे प्रसिध्द केले आहे.

Email : kvkdahigaon@gmail.com, Website : www.kvkdahigaon.org

**मुख्य संपादक : डॉ.एस.एस.कौशिक (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)**

सह संपादक : श्री.सचिन बडधे (विषय विशेषज्ञ,कृषि विस्तार)

-: संपादक मंडळ :-

श्री.माणिक लाखे (विषय विशेषज्ञ,पीक संरक्षक)

श्री.नंदकिशोर दहातोंडे (विषय विशेषज्ञ,उद्यानविद्या)

डॉ.चंद्रशेखर गवळी (विषय विशेषज्ञ,पशुविज्ञान)

श्री.प्रकाश हिंगे (प्रक्षेत्र व्यवस्थापन)

श्री.नारायण निबे (विषय विशेषज्ञ,कृषि विद्या)

इंजि.राहुल पाटील (विषय विशेषज्ञ,कृषि अभियांत्रिकी)

श्री.प्रकाश बहिरट (प्रयोगशाळा तंत्रज्ञ,मृद परिक्षण)

श्री.वैभव नगरकर (कार्यक्रम सहाय्यक,संगणक)